:: प्रेस नोट ::

दि. २४/०१/२०२४

आरोपी लोकसेवक - १)श्री.वैभव बाबुराव जाधव वय ४४ वर्ष महसुल सहायक नेमणुक उपविभागीय कार्यालय,माजलगाव वर्ग-३ रा.कालिका नगर,माजलगाव जि.बीड २) श्री.शेख आसेफ अहमद वय 24 वर्ष राहणार शिवाजीनगर शिवाजी चौकाचे बाजुला माजलगाव जि.बीड. यांना ३००००/- ( तीस हजार रुपये) लाच स्विकारल्या वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड यांचेकडुन कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड |
| पोलीस स्टेशन | माजलगाव शहर |
| गुन्हा नोंद कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)श्री.वैभव बाबुराव जाधव वय ४४ वर्ष महसुल सहायक नेमणुक उपविभागीय कार्यालय,माजलगाव वर्ग-३ रा. कालिका नगर,माजलगाव जि.बीड २) श्री.शेख आसेफ अहमद वय 24 वर्ष राहणार शिवाजीनगर शिवाजी चौकाचे बाजुला माजलगाव जि.बीड. |
| लाचेची मागणी रक्कम | ३००००/- रुपये ( तीस हजार रुपये) |
| थोडक्यात माहिती | दिनांक २४/०१/२०२४ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे दोन मुलांचे व त्यांच्या भावाचे दोन मुलांचे तसेच भावाची मुलगी आणि बहीन असे सहा व्यक्तीचे राजगौंड जातीचे अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्र मिळणे करीता सेवासेतु केंद्राद्वारे तहसिल कार्यालय धारुर येथे ऑनलाईन पध्दतीने प्रकरणे दाखल केली होती. तहसिल कार्यालयाची कारवाई होऊन तक्रारदार यांचे सर्व प्रकरणे उपविभागीय कार्यालय माजलगाव येथे दाखल केले. सदर प्रकरणात यातील लोकसेवक श्री.जाधव यांनी उपविभागीय अधिकारी माजलगाव यांचेकडुन चार प्रकरणांचे जात प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी मोबदला म्हणुन लोकसेवक श्री.जाधव हे प्रत्येक प्रमाणपत्रासाठी २००००/- रुपये प्रमाणे सहा प्रमाणपत्रांचे १२००००/- रुपयांची मागणी करत आहेत. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड येथे तक्रार दिली.<br>दिनांक २४/०१/२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी केली असता लोकसेवक श्री.जाधव यांनी पंचासमक्ष ५००००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोअंती ४००००/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले.<br>दिनांक २४.०१.२०२४ रोजी सापळा लावला असता आलोसे श्री.जाधव यांनी तडजोडीअंती मान्य केलेली रक्कम ४००००/- पैकी ३००००/- रुपये पंचासमक्ष खाजगी इसम श्री.शेख असेफ यांने लोकसेवक वैभव जाधव यांचे सांगनेवरुन लाच रक्कम ३००००/- लागलीच स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे.<br>१)श्री.वैभव बाबुराव जाधव वय ४४ वर्ष महसुल सहायक नेमणुक उपविभागीय कार्यालय,माजलगाव वर्ग-३ रा.कालिका नगर,माजलगाव जि.बीड २) श्री.शेख आसेफ अहमद वय 24 वर्ष राहणार शिवाजीनगर शिवाजी चौकाचे बाजुला माजलगाव जि.बीड. यांना पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन ३००००/-रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम स्विकारल्या वरुन त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे माजलगाव शहर जिल्हा बीड येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदरची कारवाई मा.संदीप आटोळे,पोलीस अधीक्षक, लाप्रवि छत्रपती संभाजी नगर,श्री.राजीव तळेकर,प्रभारी अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि छत्रपती संभाजी नगर,यांचे मार्गदर्शनाखाली, श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक, बीड व पोलीस अंमलदार श्री. सांगळे,गोरे,राठोड व चालक म्हेत्रे सर्व ला.प्र.वि.बीड युनिट यांनी कारवाई केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड

संकेतस्थळ :- **acbwebmail@mahapolice.gov.in**

ई-मेल :- १) **dyspacbbeed@mahapolice.gov.in**
2) **dyspacbbeed@gmail.com**

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- **acbmaharashtra.net**

टोल फ्रि कमांक :- १०६४

दुरध्वनी कमांक :- ०२४४२-२२२६४९

व्हॉटस अप क. :- ९९३०९९७७००

पोलीस अधीक्षक,लाप्रवि, छत्रपती संभाजी नगर :- ९९२३०२३३६१

अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, छत्रपती संभाजी नगर :- ९८२३४९८७७७

पोलीस उप अधीक्षक,लाप्रवि,बीड :- ९३५५१००१००

( शंकर शिंदे )
पोलीस उप-अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.